# आकाशवाणी नागपूर,

# प्रादेशिक वृत्त विभाग

## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

## मंगळवार, दिनांक १० सप्टेंबर २०२४

### ठळक बातम्या

- **अटल बांधकाम कामगार आवास योजनेंतर्गत जागा खरेदीसाठीच्या अर्थ सहाय्यात दुपटीने वाढ- 1 लाख रुपयांचं मिळणार अर्थसहाय्य.**
- **नागपूरच्या 'मिहान' प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यास शासनाचं प्राधान्य असून, त्यासाठी मिहान प्रशासनानं तातडीने पावलं उचलावीत -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश.**
- **गणेश मंडळांनी आपल्या सामाजिक कर्तव्याला अधोरेखित करण्यासाठी रक्तदानासारख्या पवित्र कार्यात पुढाकार घेण्याचं नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांचं आवाहन.**
- **भंडारा आणि गोंदिया जिल्हयात आज अतिवृष्टीचा रेड अलर्ट, तर नागपुरात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.**

****

अटल बांधकाम कामगार

अटल बांधकाम कामगार आवास योजनेतंर्गत स्वत:ची जागा नसलेल्या कामगारांना जागा खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या 50 हजार रूपयांच्या अर्थसाहाय्यात दुपटीने वाढ करून 1 लाख रूपये करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. आमदार चंद्रशेखर बावनकुळे आणि आशिष जयस्वाल यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह इथं बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा नियोजनाच्या निधीतून अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गासाठी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेंतर्गत सौर विद्युत संच देण्याच्या सूचना देखील उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. आदिवासी क्षेत्रातील शेतकऱ्यांना सौर पंपासह विंधन विहिरी घेण्यासाठी परवानगी देण्यात यावी, असंही फडणवीस यांनी सांगितलं.या बैठकीत नागपूर जिल्हयात मोदी आवास योजनेतून वाढीव घरकुलांचे उद्दिष्ट देणे, त्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमणे, कामगारांना देण्यात येणाऱ्या

वस्तूंमध्ये कामगारांच्या गरजेच्या वस्तूंचा समावेश करणे इत्यादी विषयांवरही चर्चा करण्यात आली.

मिहान प्रकल्पग्रस्त

नागपूरच्या 'मिहान' प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यास शासनाचं प्राधान्य असून त्यासाठी मिहान प्रशासनानं तातडीने पावलं उचलावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिले. मिहान प्रकल्पाबाबतची बैठक काल सह्याद्री अतिथीगृह इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. मिहान प्रकल्पांतर्गत विकसित भूखंडासाठी आकारण्यात येणारे विकास शुल्क हे जनतेला परवडेल असे असावे, परिसरातील ग्रामपंचायत क्षेत्रात बांधण्यात आलेली व्यापारी संकुलं ही ग्रामपंचायतींना उत्पन्नाचे साधन म्हणून हस्तांतरीत करावी, तसेच पुनर्वसन काळातील मिहान भागातील ग्रामपंचायतींना पाठवलेल्या पिण्याच्या पाण्याची बिलं संबंधित यंत्रणांनी कमी करावी, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. मिहान क्षेत्रात म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांना स्थलांतरासाठी त्या परिसराच्या बाहेर जागा उपलब्ध करुन द्यावी, तसेच मिहान प्रकल्पबाधित कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी विकसित भूखंडांचं वाटप लवकरात लवकर करावं असे निर्देश फडणवीस यांनी दिले. मिहान परिसरातील ग्रामपंचायतींना करवसुलीचे अधिकार नसल्याने त्यांना उत्पन्नाचे साधन मिळण्यासाठी एमआयडीसीकडून वापरण्यात येणारं सूत्र अवलंबण्यात यावं अशा सूचना देखील उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

“मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे “मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना” राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिध्दी करणे तसेच त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ पोहचविण्यासाठी ५० हजार योजनादूत नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. योजनादूत कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतची जबाबदारी माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नेमणूक केलेल्या योजनादूतांचे मानधन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाकडून देण्यात

येणार आहे. तसेच योजनादूतांच्या निवडीचे निकष, अटी, शर्ती तयार करण्याबाबतची कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येणार आहे.

ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट यंत्रणा

राष्ट्रीय महामार्गांवर उपग्रह संदेश प्रणालीमार्फत टोल भरण्यासाठी एक मार्गिका राखीव ठेवण्यात येणार आहे. या मार्गिकेतून जाणाऱ्या वाहनांमधे ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट यंत्रणा बसवलेली असली पाहिजे, अन्यथा या वाहनांकडून दुप्पट टोल वसूल केला जाईल असं रस्ते वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. वाहतुकीचा राष्ट्रीय परवाना नसलेल्या मात्र जीएनएसएस लावलेल्या वाहनांना राष्ट्रीय महामार्गाचा वापर २० किलोमीटर अंतरापर्यंत विनाशुल्क करता येणार आहे.

कार अपघात-देवेंद्र फडणवीस

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाच्या मालकीच्या असलेल्या कार मुळे काल मध्यरात्री नागपुरात काही गाड्यांना अपघात झाला याबाबत पोलीस योग्य तो तपास करत आहे आणि एफ आय आर मध्ये सर्व गोष्टींचा उलगडा सुद्धा पोलिसांनी केला आहे .परंतु फक्त बावनकुळे यांना अडकवण्यासाठी या गोष्टीचे राजकारण करणे योग्य नाही असं उपमुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर इथं प्रसार माध्यमांशी बोलतांना स्पष्ट केलं. अनिल देशमुख यांच्यावर होत असलेली कारवाई ही सीबीआय करत आहे गिरीश महाजन यांना अडकवण्याच्या प्रयत्नात गृहमंत्री असताना अनिल देशमुख यांनी गैरमार्गाचा वापर केला तो आता समोर येत असून त्यावर कारवाई होत असल्याचं देखील फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

बळवंत येरपुडे निधन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सहकारी, बळवंत येरपुडे यांचं वयाच्या 85 व्या वर्षी निधन झालं.10 वर्ष ते रामटेक नगरपरिषदेचे नगराध्यक्ष होते. गुरुदेव विद्यामंदिरात काही काळ शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली होती. श्रीगुरुदेव प्रकाशन विभाग प्रमुख असतांना त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याचा व्यापक प्रसार

आणि प्रचार केला. मागील अनेक वर्षांपासून ते गुरुकुंज आश्रमात वास्तव्य करीत होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज रामटेक इथं अंतिम संस्कार करण्यात आले.

रक्तदान

स्वातंत्र्याचे मुल्य जनमानसात रुजावे, समाज एकात्म व्हावा, समाजात जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. या मुल्यांचे भान ठेवून आता गणेशोत्सव साजरा करतांना प्रत्येक गणेश मंडळांनी आपल्या सामाजिक कर्तव्याला अधोरेखित करण्यासाठी रक्तदानासारख्या पवित्र कार्यात पुढाकार घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केलं. नागपूर महानगरात तब्बल 1 हजार 207 गणेश मंडळांनी नोंदणी केली असून यातील प्रत्येक मंडळातल्या किमान 10 पदाधिकाऱ्यांनी रक्तदान केलं तर 10 हजारांपेक्षा अधिक युनीट रक्त जमा होऊन ते गरजुंसाठी विनासायास उपलब्ध होईल, असंही ते म्हणाले. जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, महानगरपालिका व गणेश मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आज गायत्री नगर इथं रक्तदान शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं. या शिबीरात पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, व्हीआयपीएलचे श्रेयस उगेमुगे यांनी रक्तदान केलं.

गणेशउत्सव विशेष

वाशिम जिल्ह्यातील कारंजा इथं हौशी बाल गणेश मंडळ, भाजी मंडई, कारंजा यांच्या वतीने यावर्षी बांबूच्या साहित्यापासून पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्यात आली आहे. या माध्यमातून सदर गणेश मंडळाने जिल्ह्यातील बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्याचा संदेश दिला आहे.महा मेट्रोच्या वतीने मेट्रो प्रवाश्या करता गणेशोत्सव लकी ड्रॉ स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. नागपूर शहरातील १० गणेशोत्सव मंडळ आणि मेट्रो स्टेशन या ठिकाणी लकी ड्रॉ बॉक्स ठेवण्यात आले आहेत ज्यामध्ये मेट्रो प्रवाश्यानी प्रवास केल्यानंतर त्याची मेट्रो तिकीट या बॉक्स मध्ये जमा करायचे आहे. या स्पर्धेचा कालावधी १७सप्टेंबर पर्यंत असून, तिकिटावर नाव आणि मोबाईल क्रमांक टाकायचा आहे. विजेत्यांना बक्षिसं देण्यात येणार आहे.

रौप्य पदक

वर्धा जिल्हयातील पुलगावचे फायरमॅन जयदेव यांनी डेन्मार्क इथं आयोजित' वर्ल्ड फायर फायटर्स गेम २०२४' मध्ये दहा हजार मीटर खुली स्पर्धा आणि तीन हजार मीटर 'स्टीपलचेस' या प्रकारात रौप्य पदक जिंकलं  आहे. जगातल्या 45 देशातून फायर फायटर्स या स्पर्धेसाठी एकत्र आल्याची माहिती नागपूरचे संरक्षण जनसंपर्क अधिकारी यांनी पत्रकाद्वारे दिली.

सोन्याचा भाव

देशात सध्या २४ कॅरेट सोन्याचा भाव ७३ हजार रुपये प्रति १० ग्रॅमच्या आसपास आहे. दिवाळी आणि त्यानंतर लग्नसराईचा हंगाम सुरू झाल्यावर सोन्याचे दर ७६ हजारांहून अधिक होण्याची शक्यता बाजारातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किमतीत झालेली वाढ आणि देशांतर्गत शेअर बाजारातही सोन्याने नवे उच्चांक गाठण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे यावर्षी सप्टेंबरमध्ये सोन्याच्या खरेदीत मोठी वाढ झाली आहे. नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या लग्नसराईसाठी ज्वेलर्सकडे आगाऊ बुकिंग सुरू झाली आहे. सप्टेंबर महिन्यात सोन्याच्या दागिन्यांची विक्री आणि आगाऊ बुकिंग ५० टक्क्यांपर्यंत वाढल्याचा दावा करण्यात येत आहे.

हवामान

विदर्भातील भंडारा आणि गोंदिया जिल्हयात आज मेघगर्जनेसह अती मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय नागपूर जिल्हयातील जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलाय, त्यानुसार काल रात्री आणि आज पहाटेपासून नागपुरात संततधार पाऊस पडतो आहे.  याशिवाय विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली इथं देखील मुसळधार पावसाची शक्यता आहे.  वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या जिल्हयात काही ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असून सतर्कतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या देखील विदर्भाच्या सर्व जिल्हयांमध्ये वादळी पर्जन्यमानाची  शक्यता असल्याने सतर्कतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गोंदिया जिल्हयात काल रात्री ढगफुटी सारखा पाऊस पडल्यामुळेजिल्हयात पूर परिस्थिती निर्माण झाली. गोंदिया शहरातून वाहणाऱ्या नाल्यालगतचं घर पाण्यात कोसळूनएकाचा मृत्यू झाला आहे. तर एक महिला

घराच्या ढिगाऱ्याखाळी अडकल्याचंवृत्त आहे. बचाव कार्य सुरू आहे. गोंदियाजिल्ह्यात सूर्याटोला भागाला बांध तलाव ओसंडून वाहू लागल्यामुळे अनेक घरात पाणी शिरलंआहे तर ग्रामीण भागात नदी नाले ओसंडून वाहू लागले असून, आणि अनेकगावांचा संपर्क तुटला आहे. काल रात्री पासून जनजीवन विस्कळीतझालं आहे अशी माहिती यांच्या परतिनिधी ने दिली. गडचिरोली जिल्ह्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस पडल्याने १७ मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. काल सकाळपासून भामरागड गावात शिरलेले पर्लकोटा नदीच्या पुराचे पाणी अजूनही कायम असून, तेथील ३२६, तर सिरोंचा तालुक्यातील कर्जेली येथील २८ जणांना निवारागृहात हलविण्यात आले आहे. मागील चोवीस तासांत कोरची तालुक्यात सर्वाधिक १५३.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल मुलचेरा तालुक्यात १२५.६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. दरम्यान, गोसेखुर्द धरणातून १ लाख ९० हजार क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून, नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिला आहे. भंडारा जिल्ह्यात उद्या शाळा, महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

*****